# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**३७) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०८.०७.२०२५**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (०१/०७/२०२५ ते ०७/०७/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०९/०७/२०२५ ते १३/०७/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | दिनांक | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | १५ | १२ | ६ | ३ | ३ |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३१ | ३१ | ३१ | ३१ | ३० |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | २३ | २३ | २३ | २३ | २३ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ७ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८५ | ८४ | ८३ | ८४ | ८२ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५९ | ५९ | ५५ | ६३ | ६२ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १२ | १२ | १३ | १५ | १५ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तसेच **पुढील पाच दिवस काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| **सामान्य सल्ला** | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) वीजेच्या अंदाजाचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>३) पावसाळ्यात फवारणी करीताना स्टीकरचा वापर करावा. |
| **संदेश** | | पाऊसाचा अंदाज घेवून गरजेनुसार पिकांमध्ये कोळपणी करून घ्यावी. |
| **खरीप पिके** | **पेरणी** | ७ जुलैनंतर मुग, उडीद, तूर, ज्वारी यापिकांची पेरणी करू नये. पेरणी जसजशी उशिरा होत जाईल त्याप्रमाणे उत्पादनात मोठी घट होते.<br>ज्या ठिकाणी पेरणी बाकी असेल त्याठिकाणी जमिनीतील ओल लक्षात घेऊन पेरणी योग्य पाऊस झालेल्या ठिकाणी वाफसा आल्यानंतर १५ जुलैपूर्वी बाजरी, मका, नाचणी, भुईमूग, सोयाबीन, सूर्यफूल यापिकांची पेरणी पूर्ण करून घ्यावी. |
| **कांदा** | **लागवड** | खरीप कांद्याच्या रोपाच्या लागवडीसाठी रान बांधणी करावी, त्यासाठी सरी वरांबे तयार करण्यापूर्वी हेक्टरी ४० टन शेणखत चांगले मिसळून घ्यावे.<br>लागवडीचे अंतर १५ x १० से.मी. ठेवणे आवश्यक आहे त्या पद्धतीने सरी वरंबे तयार करावे. हेक्टरी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, व ५० किलो पालाश लागवडीच्या वेळेस द्यावे. |
| **कापूस** | **उगवण** | पेरणीनंतर कापसाची सर्ववसाधारणपणे १० दिवसांत उगवण होते ज्या ठिकाणी उगवण झालेली नसेल त्या ठिकाणी राखून ठेवलेल्या बियाण्यापासूनच, त्याच वाणाचे बियाणे नांग्या भरण्यासाठी वापरावे व लगेच पाणी द्यावे. आणि १५ दिवसांनंतर प्रत्येक फुलीवर दोनच जोमदार रोपे ठेवुन बाकीची उपटून टाकावीत. |
| **मूग उडीद** | **उगवण** | २० ते २५ दिवसांनी कोळपणी करून घ्यावी. |
| **मका** | **उगवण** | ८ ते १० दिवसांनी पहिली कोळपणी करून घ्यावी तसेच गरजेनुसार नांगे भरणी करून घ्यावे. |
| **बाजरी** | **उगवण** | १० दिवसांनी कोळपणी करून घ्यावी. |
| **भुईमूग** | **उगवण** | १० ते १५ दिवसांनी कोळपणी करून घ्यावी. |
| **तूर** | **उगवण** | ज्वारी/ मका (२५० ग्रॅम/ हेक्टर) हे मिश्र पीक घ्यावे (शक्य असल्यास) म्हणजे त्याचा सजीव पक्षीथांबे म्हणून उपयोग होतो तसेच किडीच्या नैसर्गिक शत्रू किटकांची जोपासना होण्यास मदत होते. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **सोयाबीन** | **रोप अवस्था** | स्पोडोप्टेरा अळीच्या उपद्रवाचा आगाऊ अंदाज घेऊन नुकसान टाळण्यासाठी हेक्टरी ५ स्पोडोलूरचा वापर करण्यात आलेले फेरोमेन सापळे नियंत्रणासाठी वापरावेत. |
| **पशूसंवर्धन** | | पावसाळ्यात जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत. पशुपालकांनी आपल्या भागात कोणत्या प्रकारचे जंत आहेत याची माहिती करून घ्यावी. जंतांचे प्रकार जाणून घेण्यासाठी जनावरांच्या शेणाची तपासणी करून घ्यावी. जंतांचे प्रकार समजल्यावर पशुवैद्यकाच्या सहाय्याने नियंत्रणासाठी व प्रमतिंधात्मक उपायांसाठी उपयुक्त व प्रभावी औषधे निवडावे. जनावरांची रोग प्रतिकारशक्ती वाढवावी. जेणेकरून जंतांच्या वाढीला आळा बसतो. त्यांचे नियंत्रण होते. याकरिता जनावरांना उत्तम संतुलित आहार द्यावा. जनावरांचा गोठा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवणे व वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणे महत्त्वाचे आहे. औषधे देतांना औषध योग्य मात्रेतच द्यावे त्याकरता वेष्टनावरील सूचना पाळाव्यात. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : ०८.०७.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**